**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 07.07.2024** **वार – रविवार**

---

शासनआदेश

शासकीय दस्ताऐवजांवर संबंधित व्यक्तीच्या नावापुढे आईचं नाव लिहिणं  आणि महानगरपालिकेतील सर्व प्रशासकीय कामकाज मराठी भाषेतून करणं या दोन्ही शासन निर्णयांची अंमलबजावणी पिंपरी चिंचवड महापालिकेत सुरु झाली आहे. त्यानुसार आयुक्त शेखर सिंह यांच्या दालनाबाहेरील नामफलकामध्ये बदल करून ‘’शेखर अनीता चंद्रहास सिंह’’ असा नामफलक लावण्यात आला आहे. तसंच महापालिकेतील अधिकारी कर्मचाऱ्यांनी प्रशासकीय दस्ताऐवजांवर मराठी भाषेत स्वाक्षरी करण्यास सुरूवात केली आहे.

आनंददायीशाळा

पुणे महापालिकेच्या अनसूयाबाई खिलारे शाळेत बालरंजन केंद्राच्या संचालिका आणि माजी नगरसेविका माधुरी सहस्त्रबुद्धे यांनी आनंददायी शाळा या उपक्रमाचं आयोजन केलं आहे. पहिल्याच शनिवारी ४० मुलांना  अवांतर वाचनासाठी गोष्टींची पुस्तकं देण्यात आली. पुढच्या सहा महिन्यांतील २४ शनिवारच्या उपक्रमांचं नियोजन तयार करण्यात आलं

आहे. बालरंजन केंद्रातल्या चार ताई दर शनिवारी शाळेत जाऊन मुलांना प्रार्थना, पावसाची गाणी, बोधप्रद गोष्टी, व्यायाम, गंमतीचे खेळ आणि कलात्मक गोष्टी शिकवतात.

झिका-भूषण-माधवी

पुण्यात झिकाचा प्रसार वाढत असून शहरात आणखी दोन रुग्ण आढळून आले आहेत. कर्वेनगर परिसरात 42 वर्षीय महिलेला तसंच खराडी इथल्या एका 22 वर्षीय तरुणाला झिकाची लागण झाल्याचं निष्पन्न झालं आहे. शहरातील झिकाबाधित रुग्णांची संख्या आता 12 झाली आहे.

रोजगारमेळावा

युवक युवतींनी औद्योगिक कंपन्यांमध्ये उपलब्ध असलेल्या रोजगार संधींचा लाभ घ्यायला हवा असं आवाहन;  “मी सेवेकरी फाउंडेशन”चे अध्यक्ष सुधीर मुंगसे यांनी केलं. ते आज पुणे जिल्ह्यातल्या खेड तालुक्यात वाकी बुद्रुक  इथं आयोजित रोजगार मेळाव्यात बोलत होते. चाकण, पिंपरी चिंचवड औद्योगिक परिसरातील 35 औद्योगिक कंपन्यांनी या रोजगार मेळाव्यात सहभाग घेतला असून 2 हजारहून अधिक युवकांनी या रोजगार मेळाव्यासाठी नाव नोंदणी केली आहे.

एआरएआय

पुण्यातील स्वयंचलित वाहन संशोधन संस्था अर्थात ए आर ए आय या केंद्रीय संस्थेच्या विस्तारित प्रकल्पासाठी वन विभागाची सुमारे २० हेक्टर जमीन देण्यास वेताळ टेकडी बचाव समितीनं तीव्र विरोध दर्शवला आहे. वन विभागाची ही जमीन या संस्थेला द्यायची झाल्यास त्यावरील १८ हजार २८७ झाडे तोडावी लागणार असल्याचा आक्षेप या समितीनं घेतला आहे. याखेरीज लष्कराच्या शस्त्रास्त्र संशोधन आणि विकास संस्थेनं देखील या जमीन हस्तांतरणास आक्षेप नोंदवला आहे. केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्रालयानं संस्थेच्या विस्तार प्रकल्पासाठी वन विभागाची जमीन देण्यास तत्वतः मान्यता दिली असली तरी स्थानिक वन विभागाकडून देखील काही आक्षेप नोंदवले गेले आहेत, त्याबद्दलची पूर्तता अद्यापपर्यंत झालेली नाही. पुण्याच्या पर्यावरण संतुलनाचा दृष्टीनं अतिशय महत्वपूर्ण मानल्या गेलेल्या वेताळ टेकडीवर सध्या समृद्ध जैववैविध्य दर्शवणाऱ्या वनस्पती आणि दुर्मिळ झाडं असून उद्योग विस्ताराच्या नावाखाली पर्यावरणाचा ऱ्हास आम्ही होऊ देणार नाही अशी स्पष्ट भूमिका वेताळ टेकडी बचाव समितीनं घेतली आहे.

मिळकतकर

पुणे शहरातील स्व-वापराच्या निवासी मिळकतींना मिळकत करात 40 टक्के सवलतीच्या अनुषंगानं पुणे महापालिकेनं मिळकतीची तपासणी मोहीम सुरु केली आहे. त्यानुसार 3 लाख 72 हजार मिळकतींचं सर्वेक्षण केलं जाणार आहे. त्यासाठी अतिरिक्त 375 कर्मचारी विभागाला मिळाले आहेत. मात्र आदेश मिळून 10 दिवस उलटून गेले तरी यापैकी फक्त 75 कर्मचारी विभागाकडे रुजू झाले आहेत. तर दुसरीकडे जे कर्मचारी सर्व्हेक्षण करत

आहेत, त्यांना नागरिकांकडून फारसा चांगला प्रतिसाद मिळत नसल्याचं चित्र आहे.

सिंहगड

भुशी धरणाच्या जवळील धबधब्यावर पाच जण वाहून गेल्याची घटना घडल्यानंतर पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी गड, धरणे, धबधबे या ठिकाणी जमावबंदीचे आदेश दिले आहेत. परंतु, तरीही सिंहगडावर काल आणि आज हजारो पर्यटकांची गर्दी झाल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आणि अपघाताचा संभाव्य धोका लक्षात घेऊन प्रशासनानं हा निर्णय घेतलेला आहे; मात्र उत्साही पर्यटक त्याकडे साफ दुर्लक्ष करत असल्याचं चित्र आहे.

घुसखोर

बेकायदा घुसखोरी करून राहणाऱ्या 42 बांगलादेशी घुसखोरांचे भारतीय पासपोर्ट पिंपरी चिंचवड दहशतवाद विरोधी शाखेने रद्द केले आहेत. निगडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत बांगलादेशी घुसखोर राहत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यावरुन निगडी पोलिसांनी त्यांचा शोध घेऊन त्यांना अटक केल्याचं वृत्त संस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

बाजारसमिती

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. मागणी वाढल्याने कोबी आणि टोमॅटोच्या भावात 20 टक्क्यांपर्यंत वाढ नोंदवण्यात आली. गेल्या महिनाभरापासून तेजीत असणाऱ्या पालेभाज्यांच्या भावाला काहीसा लगाम बसला असून बहुतांश पालेभाज्यांचे भाव दहा ते वीस टक्क्यांपर्यंत खाली आले आहेत. फळ बाजारात पपई, चिक्कू आणि खरबूजाच्या भावात वाढ झाली. फूल बाजारात शोभिवंत फुलांना मागणी वाढली असून फुलांचे भाव दहा टक्क्यांपर्यंत वाढले आहेत.

हवामान

पुणे आणि परिसरात आज पावसाच्या हलक्या सरी पडल्या. उद्याही शहरात हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**